ePaper

# इराणची अमेरिका-इस्रायला नवी धमकी!

वर्ष - ९ वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™






पान 2 वरुन...

इंधन तुटवड्याची भीती दूर!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 27 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तुर्कीस्तानच्या मदतीनं ऑस्ट्रेलियाकडून मिळणार 'लेझर वेपन'?

# पाकिस्तानी नौदलाची ताकद वाढणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तानच्या संरक्षण क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान समाविष्ट करण्याच्या हालचालींना वेग आला असून, आता लेझर वेपन सिस्टम (LWS) खरेदीच्या दिशेने पाकिस्तान नौदलाने ठोस पावले उचलली आहेत. ड्रोनविरोधी क्षमतांमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने या प्रणाली जहाजांवर तैनात करण्याची योजना आखण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तान तुर्की आणि ऑस्ट्रेलियासोबत सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.**



पाकिस्तान नौदलाच्या खरेदी संचालनालयाने ४ फेब्रुवारी रोजी दोन १० किलोवॅट क्षमतेच्या लेझर शस्त्र प्रणाली आणि त्यासोबत अत्याधुनिक रडार प्रणालींसाठी निविदा जारी केली आहे. या निविदेमुळे पाकिस्तानची लष्करी धोरणे अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित बनवण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. विशेषतः ड्रोन हल्ल्यांच्या वाढत्या धोक्याला लक्षात घेता, लेझर शस्त्र प्रणाली अत्यंत प्रभावी उपाय मानली जाते.

लेझर वेपन सिस्टम म्हणजे निर्देशित ऊर्जा शस्त्रांचा एक प्रकार असून, त्यामध्ये अत्यंत केंद्रित ऊर्जा किरणांचा वापर करून लक्ष्य नष्ट केले जाते. पारंपरिक क्षेपणास्त्रांच्या तुलनेत या प्रणाली कमी खर्चिक, अचूक आणि जलद प्रतिसाद देणाऱ्या मानल्या जातात. ड्रोन, लहान बोटी किंवा येणाऱ्या क्षेपणास्त्रांना निष्प्रभ करण्यासाठी या प्रणाली उपयुक्त ठरतात.

या क्षेत्रात ऑस्ट्रेलियाची Electro Optic Systems (EOS) ही कंपनी एक महत्त्वाची खेळाडू म्हणून उदयास आली आहे. EOS ने ‘अपोलो’ नावाची उच्च-शक्तीची लेझर शस्त्र प्रणाली विकसित केली असून ती १०० किलोवॅट क्षमतेपर्यंत कार्य करू शकते. ही प्रणाली विविध प्रकारच्या लष्करी गरजांसाठी उपयुक्त ठरते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तिची मागणी वाढत आहे.

याशिवाय, Roketsan ही तुर्कीतील आघाडीची संरक्षण कंपनीही या प्रकल्पात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. फेब्रुवारी महिन्यात सौदी अरेबियामध्ये आयोजित World Defense SHOW दरम्यान EOS आणि रॉकेटसान यांच्यात लेझर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्रांच्या संयुक्त विकासासाठी धोरणात्मक सहकार्य करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही देशांमधील तांत्रिक सहकार्य अधिक बळकट होण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानने या दोन्ही कंपन्यांसोबत संपर्क साधल्याचे संकेत मिळत आहेत. तुर्कीशी असलेले पाकिस्तानचे संरक्षण क्षेत्रातील संबंध आधीपासूनच मजबूत आहेत, त्यामुळे या प्रकल्पात तुर्कीची भूमिका निर्णायक ठरू शकते. ऑस्ट्रेलियन तंत्रज्ञान आणि तुर्कीची उत्पादन क्षमता यांचा संगम पाकिस्तानला आधुनिक शस्त्रास्त्र प्रणाली विकसित करण्यात मदत करू शकतो.

तज्ज्ञांच्या मते, या प्रकारच्या लेझर शस्त्र प्रणालींचा वापर भविष्यातील युद्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या तुलनेत या प्रणाली जलद, अचूक आणि तुलनेने कमी खर्चिक असल्यामुळे अनेक देश त्याकडे आकर्षित होत आहेत. विशेषतः नौदलासाठी, जहाजांवरून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांना थांबवण्यासाठी ही प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरते.

मात्र, या घडामोडींमुळे दक्षिण आशियातील सामरिक संतुलनावरही परिणाम होऊ शकतो. भारतासारख्या देशांनीही अशा तंत्रज्ञानावर लक्ष ठेवण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. संरक्षण क्षेत्रातील स्पर्धा वाढत असताना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे ही काळाची गरज बनली आहे.

## भारताचं टेन्शन का वाढणार?

जर पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाची आधुनिक लेझर शस्त्रे मिळवली तर त्याची लष्करी ताकद निश्चितच वाढेल. इतकेच नाही तर तुर्कीसोबतचे त्यांचे लष्करी संबंधही सुधारतील. 'ऑपरेशन सिंदूर' वेळी पाकिस्तान आणि तुर्की एकजूट झालेले दिसले होते याद्दष्टीने भारत या डिलकडे पाहत आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधांना कटुतेचा मोठा इतिहास आहे.

## लेझर प्रणालीत खास काय?

अरबी समुद्रातील ड्रोन आणि कमी खर्चाच्या हवाई हल्ल्यांच्या वाढत्या धोक्याविरुद्ध आपल्या संरक्षण प्रणालींचे आधुनिकीकरण करण्याच्या पाकिस्तान नौदलाच्या प्रयत्नांमधील ही निविदा एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही खरेदी प्रक्रिया अजूनही निविदा टप्प्यात आहे. अद्याप कोणताही करार निश्चित झालेला नाही. लेझर शस्त्र प्रणाली हे एक डायरेक्टेड एनर्जी वेपन (DEW) आहे. लेझर किरणाचा वापर करून ते प्रकाशाच्या वेगाने शत्रूचे ड्रोन, क्षेपणास्त्रे, रॉकेट आणि लहान जहाजांवर हल्ला करू शकते. हे ऊर्जा-आधारित शस्त्र, प्रत्यक्ष गोळ्या वापरण्याऐवजी लक्ष्याला वितळवण्यासाठी किंवा त्याच्या इलेक्ट्रॉनिक प्रणाली निष्क्रिय करण्यासाठी केंद्रित उष्णतेचा वापर करते.

## तुर्कीची रॉकेटसन आणि ऑस्ट्रेलियाची EOS

रॉकेटसनने आपली अल्का लेझर शस्त्रप्रणाली विकसित केली आहे. हे एक बहुपयोगी अँटी- UAV शस्त्र आहे. यामध्ये समायोज्य-शक्तीचा लेझर, इलेक्ट्रॉनिक जॅमर, इलेक्ट्रो-ऑप्टिक सेन्सर आणि रडार यांचा समावेश आहे.

# इंधन तुटवड्याची भीती दूर!

## 100 जहाजे भारताच्या दिशेला रवाना', पेट्रोल असोसिएशनच्या सदस्यांची माहिती

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात पेट्रोल पंपांवर वाढलेली गर्दी आणि काही पंप बंद असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमावर आता स्पष्टता आली आहे. पेट्रोल असोसिएशनच्या कोअर कमिटीचे सदस्य अली दारुवाला यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही परिस्थिती तुटवड्यामुळे नसून तांत्रिक आणि आर्थिक कारणांमुळे निर्माण झाली आहे. अचानक क्रेडिट विड्रॉ केल्यामुळे अनेक पेट्रोल पंप चालकांना अडचणींचा सामना करावा लागला.**




### 'परिस्थिती हळू हळू सुरळीत होणार'

याशिवाय, "सरकारला इंधनावर लिटरमागे सुमारे ५० रुपयांचा फटका बसत असल्याने सध्या ॲडव्हान्स पेमेंट घेऊनच इंधन पुरवठा केला जात आहे. तसेच पीएनजी पाइपलाईनचे रखडलेले कामही उद्यापासून पूर्ण होणार आहे. एकूणच, भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुढील १० ते १२ दिवसांत परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता संयम ठेवावा", असे आवाहन अली दारुवाला यांनी केले.

पेट्रोलचा तुटवडा नसून, काही पंप मालकांकडे आगाऊ इंधन खरेदी करण्यासाठी आवश्यक पैसे नसल्यामुळेच पंप बंद ठेवावे लागले आहेत. जे पंप चालक ॲडव्हान्स पेमेंट करू शकले नाहीत, त्यांचेच पंप सध्या बंद आहेत, असं अली दारुवाला यांनी स्पष्ट केलं आहे.

"पेट्रोलचा भाव एकही रुपया वाढणार नाही," असे स्पष्ट करत त्यांनी नागरिकांना दिलासा दिला. देशात इतका मोठा साठा उपलब्ध आहे की साठवण्यासाठी जागा कमी पडेल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, लॉकडाऊनच्या भीतीमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त पेट्रोल साठवून ठेवत आहेत. एक-दोन लिटरऐवजी थेट 10 लिटर पेट्रोल घेण्याची घाई सुरू असल्याने पंपांवर अनावश्यक गर्दी होत आहे. नागरिकांनी पंपांवर गर्दी करू नये आणि जास्तीचे पेट्रोल साठवू नये", असे आवाहन त्यांनी केले आहे. "सध्या दिसणारी परिस्थिती ही केवळ अफवांमुळे निर्माण झालेली असून, प्रत्यक्षात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही", असं अली दारुवाला यांनी स्पष्ट केलं.

### '१०० जहाजे भारताच्या दिशेने रवाना'

दरम्यान, "एक सकारात्मक आणि अतिशय चांगली गुडन्यूस समोर आली आहे. आज दुपारी साडेबारा वाजता इराणचे परराष्ट्र मंत्री आणि भारताचे परराष्ट्र मंत्री यांच्यात बैठक झाली. त्यानंतर इराणने भारतासह जगातील पाच देशांना इंधन वाहतुकीसाठी परवानगी दिली आहे. भारताकडे निघालेले सर्व टँकर्स पुढील ८ ते ९ दिवसांत सुरक्षितपणे पोहोचणार आहेत. भारताला पेट्रोल, डिझेल, एलपीजी, सीएनजी आणि एलएनजीचा पुरवठा करण्यासाठी जवळपास १०० जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. पुढील ९ ते १० दिवसांत हा पुरवठा देशात पोहोचणार आहे", अशी माहिती अली दारुवाला यांनी दिली.

# पुण्यात ढगाळ हवामान तर विदर्भात पावसामुळे 'यलो अलर्ट'

**महाईन्यूज । पुणे**

**पुढील तीन दिवसांत विदर्भ वगळता राज्याच्या अंतर्गत भागात कमाल तापमानात एक ते दोन अंश सेल्सियसने वाढ होऊन त्यानंतर हळूहळू तापमानात घट होण्याची शक्यता आहे. तर पुणे आणि परिसरात आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाच्या पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.**



### पावसाच्या शक्यतेमुळे विदर्भात 'यलो अलर्ट'

पुढील चार ते पाच दिवस विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जन, विजांचा कडकडाट, ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे यलो अलर्ट देण्यात आल्याची माहिती हवामानशास्त्रज्ञांन कडून मिळत आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांत शहर आणि परिसरातील कमाल तापमानात घट झाली होती. मात्र, आता पुन्हा तापमानात वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे प्रामुख्याने दुपारी उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार शहरातील कोरेगाव पार्क, पाषाण, शिवाजीनगर, वडगाव शेरी, मगरपट्टा अशा ठिकाणी कमाल तापमान सातत्याने ३५ अंश सेल्सियसपेक्षा अधिक नोंदवले जात आहे. पुणे वेधशाळेचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप म्हणाले, समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. त्याचा जास्त परिणाम मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रावर होऊन पावसाची शक्यता आहे. बाकी भागात फारसा परिणाम नसल्याने दुपारनंतर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या होत असलेली तापमानवाढ आणखी एक दोन दिवस होऊन, त्यानंतर तापमानात घट होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार गुरुवारी अकोला येथे राज्यातील सर्वाधिक ४१.८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मध्य महाराष्ट्रातील पुणे येथे ३८, अहिल्यानगर येथे ३८.२, कोल्हापूर येथे ३६.६, जळगाव येथे ३९.५, मालेगाव येथे ३८.६, नाशिक येथे ३७.८, सांगली येथे ३६.५, सोलापूर येथे ३९.४, सातारा येथे ३७.६ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. कोकणातील मुंबई येथे ३२.६, अलिबाग येथे ३३.६, रत्नागिरी येथे ३६.३, डहाणू येथे ३२.९, मराठवाड्यातील धाराशिव येथे ३६.६, छत्रपती संभाजीनगर येथे ३८.५, परभणी येथे ४०.२, विदर्भातील अमरावतदी येथे ४१, बुलढाणा येथे ३८.५, ब्रह्मपुरी येथे ४०, चंद्रपूर येथे ३९.६, गोंदिया येथे ३८.६, नागपूर येथे ३८.८, वर्धा येथे ४० अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

# महापालिकेची जाहिरातबाजीवर उधळपट्टी

## महापालिका स्थायी समिती सभापतींचा "आर्थिक नियोजनाचा ढोंगीपणा"?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका अर्थसंकल्पावर चर्चा करताना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनाने बोगसपणा केल्याचा दावा करीत अर्थसंकल्पात आर्थिक नियोजन करीत असल्याचे भासवले. त्याद्वारे सभागृहात पोपटपंची केली. महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत आणि बचत यावर मॅनेजमेंट करीत असल्याचे अक्षरश: "कबुतरे उडवली". पण, महासभा झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी केवळ स्वच्छ भारत अभियानाच्या जनजागृतीसाठी ३८ लाख रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला.**

विशेष म्हणजे, आर्थिक संकटात महापालिका आहे, असा दावा विरोधी पक्षाकडून केला जातो. किंबहुना, महापालिका कर्जबाजारी आहे. त्याला प्रशासन जबाबदार आहे, अशी हात झटकण्याची भूमिका सत्ताधारी पक्षाकडून घेतली जाते. याचे चित्र महापालिका अर्थसंकल्प सभेत स्पष्ट दिसले. प्रशासनाला दोष देणाऱ्या स्थायी समिती सभापतींनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या एका अर्जाद्वारे रेडीओवर जाहीरात करण्यासाठी ३८ लाख रुपयांची खैरात वाटली आहे. दि.१८ मार्च २०२६ च्या नियोजित स्थायी समितीच्या अजेंड्यावर हा विषय होता. "माहिती शिक्षण व संवाद- २.०" या लेखाशिर्षामधून स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करण्यासाठी सुमारे ३८ लाख ३१ हजार ३५६ रुपये खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव होता. यावर महापालिका प्रशासन अनावश्यक उधळपट्टी करीत आहे, अशी टीका होवू लागली. त्यामुळे हा विषय तहकूब ठेवला होता. त्यानंतर महापालिका सर्वसाधारण सभा झाली. या सभेत महापालिकेची बचत, उत्पन्नाचे स्त्रोत आणि अनावश्यक कामांवर खर्च नको, असा आक्रोश नगरसेवकांनी केला. अर्थसंकल्पात १ हजाराहून अधिक उपसूचना घेण्यात आल्या. त्या स्वीकारुन स्थायीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी अर्थसंकल्पाचे श्रेय आणि नगरसेवकांची वाहवा मिळवली. पण, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी दि. २५ मार्च रोजी झालेल्या स्थायी बैठकीत हा विषय मंजूर करण्यात आला.

### भाजपा आमदार लगाम घालतील का?



स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे हे भारतीय जनता पार्टीचे आमदार शंकर जगताप यांचे निकटवर्ती आहेत. किंबहुना, जगताप यांच्या आशिर्वादानेच बारणे अध्यक्षपदावर विराजमान झाले आहेत. अर्थशास्त्र शाखेचे पदवीधर आणि उच्चशिक्षीत असलेल्या शंकर जगताप यांच्या नेतृत्वात अशापद्धतीने महापालिका स्थायी समितीकडून ४०-४० लाखांची खैरात वाटली जाते, ही बाब गंभीर आहे. किंबहुना, स्थायी समितीमध्ये आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांचे समर्थक आहेत.

### विरोधी पक्षाच्या सदस्यांचीही 'सेटलमेंट'?

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शंभूसृष्टी तथा "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" च्या कामावर टीका करताना शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी "धनेश्वर काय महापालिकेचा जावई आहे काय?" असा प्रश्न उपस्थित केला होता. भाजपाच्या चुकीच्या कामांना विरोध करण्याची भीष्मप्रतिज्ञा केलेले राष्ट्रवादीचे विरोधी पक्षनेते भाउसाहेब भोईरसुद्धा स्थायी समिती सदस्य आहेत. तसेच, "पिंपरीचा वाघ" अशा आविर्भावात सभागृहात मिरवणारे नगरसेवक संदीप वाघेरे हेसुद्धा स्थायी समिती सदस्य आहेत. "महाराजांपेक्षा कोणीही नेता मोठा नाही, थर्ड पार्टी ऑडिट केले पाहिजे..." अशी मागणी करणारे भाजपाचे नगरसेवक संदीप कस्पटे हेसुद्धा स्थायी समितीमध्ये सदस्य आहेत.

# पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाचा 'रोडमॅप' तयार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पिंपरी-चिंचवड शहराच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडण्यात यश आले आहे. केवळ प्रश्न मांडले नाहीत, तर मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून त्याबाबत सकारात्मक कृती आराखडा आणि निधीचे ठोस आश्वासनही मिळवले आहे, अशी माहिती आमदार अमित गोरखे यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**



अधिवेशनानंतर आयोजित या विशेष पत्रकार परिषदेत आमदार गोरखे यांनी शहराच्या विकासासाठी उचललेल्या पावलांचा सविस्तर आढावा घेतला. शहराच्या विस्तारित भागातील रस्ते, उड्डाणपूल आणि पाणीपुरवठा योजनांसाठी राज्य शासनाकडून विशेष निधी मिळवण्यावर भर दिला असून, प्रशासकीय प्रक्रिया गतिमान करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष श्री.शत्रुघ्न (बापू) काटे, उपमहापौर सौ.शर्मिला बाबर, शहर सुधारणा समिती अध्यक्ष श्री.संजय (नाना) काटे, ज्येष्ठ नेते श्री.सदाशिव खाडे, श्री.राजू दुर्गे, नगरसेवक श्री.तुषार हिंगे, श्री.शितल उर्फ विजय शिंदे, श्री.कुशाग्र कदम, श्री .अमित गावडे, नगरसेविका श्रीमती अनुराधा गोरखे, सौ.सुप्रिया चांदगुडे, सौ.मधुरा शिंदे, दक्षिण भारतीय आघाडी प्रमुख श्री.राजेश पिल्ले, भाजपा मंडल अध्यक्ष श्री. धरम वाघमारे, भाजपा मंडल अध्यक्षा सौ.अनिता वाळूजकर, भाजपा चिटणीस श्री.नरेश पंजाबी, श्री. राजेंद्र बाबर, श्री. युवराज लांडे, श्री.देवदत्त लांडे, श्री.नंदू कदम, श्री.नेताजी शिंदे, श्री.सुनील पलांडे, श्री.सुनील कदम उपस्थित होते.

> "शहराच्या प्रलंबित प्रश्नांवर केवळ चर्चा न करता, ते तडीस नेण्यासाठी मी विधानपरिषदेत आवाज उठवला. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये विकासाची गंगा घराघरांत पोहोचवू.
>
> - अमित गोरखे, आमदार, भाजपा.

### मुख्यमंत्र्यांची विशेष दाद

सभागृहात पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मांडणी केल्याबद्दल राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी वैयक्तिकरीत्या कौतुक केले. एका लोकप्रतिनिधीसाठी आपल्या नेत्याकडून मिळालेली ही शाबासकी म्हणजे शहराच्या सेवेसाठी मिळालेली नवी ऊर्जा आहे. पिंपरी-चिंचवडला जागतिक दर्जाचे शहर बनवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. येत्या काळात रखडलेले सर्व प्रकल्प मार्गी लावून, शहराचा समतोल विकास साधणे हेच आमचे प्राथमिक ध्येय आहे, असेही आमदार गोरखे यांनी यावेळी नमूद केले.



## भूमिका

**गाझियाबादमधील धक्कादायक हेरगिरी प्रकरणाने देशातील सार्वजनिक आणि खाजगी CCTV नेटवर्कच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण केली आहे. या प्रकरणात संशयितांनी गाझियाबाद शहरातील अत्यंत संवेदनशील ठिकाणी गुप्तपणे सौरऊर्जेवर चालणारे CCTV कॅमेरे बसवले.**

# भारतातील CCTV नेटवर्कच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह!

त्यातून मिळणारे थेट फुटेज पाकिस्तानमधील हँडलर्सकडे पाठवले जात असल्याची प्राथमिक माहिती तपास यंत्रणांना मिळाली. स्थानिक पोलिसांच्या सतर्कतेमुळे हे जाळे उघड झाले, त्यानंतर अनेक अटकसत्रे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी सुरू झाली.

या प्रकरणाने भारतातील CCTV नेटवर्कवरील नियंत्रणाचा गंभीर प्रश्न समोर आणला आहे. देशभरात CCTV कॅमेरे विविध यंत्रणांकडून स्वतंत्रपणे बसवलेले आहेत: स्थानिक पोलीस, महानगरपालिका, रेल्वे प्रशासन, संरक्षण विभाग, खाजगी कंपन्या तसेच गृहनिर्माण सोसायट्या आणि व्यावसायिक संस्था. या विविध नेटवर्कमध्ये कोणतीही एकसंध प्रणाली किंवा केंद्रीय नियंत्रण नाही. परिणामी, वेगवेगळ्या प्रोटोकॉल, सुरक्षा पद्धती आणि तांत्रिक दर्जा असलेल्या 'फ्रॅगमेंटेड इकोसिस्टम'चा निर्माण झाला आहे.



गेल्या दशकभरात भारतात CCTV नेटवर्कमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. केवळ दिल्लीमध्ये सुमारे २.५ लाख कॅमेरे बसवले गेले आहेत, तर देशभरात लाखो कॅमेरे रस्ते, कार्यालये आणि निवासी भागांमध्ये कार्यरत आहेत. या विस्तारामागे सुरक्षेची वाढलेली गरज आणि स्मार्ट सिटीज मिशन हे दोन प्रमुख घटक आहेत. अनेक शहरांमध्ये इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर्स (ICCCS) तयार करण्यात आल्या आहेत, ज्या विविध CCTV फीड, ट्रॅफिक डेटा आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली एकत्र करतात. यामुळे निरीक्षणाची क्षमता वाढली असली तरी, त्याचवेळी नेटवर्कवरील धोकेही मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. गाझियाबाद प्रकरणाने काही गंभीर तांत्रिक त्रुटी उघड केल्या आहेत. अनेक कॅमेरे अजूनही डीफॉल्ट पासवर्डवर चालतात, जे सहज हॅक करता येऊ शकतात. कमी दर्जाची उपकरणे, थेट इंटरनेट कनेक्टिव्हिटी, डेटा एन्क्रिप्शनचा अभाव आणि अनधिकृत शेअरिंग या सर्व गोष्टी सायबर सुरक्षेला मोठा धोका निर्माण करतात. त्यातच, भारतातील सुमारे ८०% CCTV हार्डवेअर परदेशातून, विशेषतः चीनमधून आयात केले जाते. HIKVISION, DAHUA आणि देशांतर्गत CP PLUS सारख्या कंपन्यांचा मोठा हिस्सा आहे. परदेशी सर्व्हरशी कनेक्ट केलेले कॅमेरे दूरस्थपणे नियंत्रित होऊ शकतात, ज्यामुळे सुरक्षा धोका वाढतो. स्मार्ट सिटी मॉडेलमध्ये सर्व प्रणाली एकमेकांशी जोडलेल्या असतात. CCTV, ट्रॅफिक सिग्नल, सेन्सर्स आणि सार्वजनिक सुरक्षा प्रणाली यांचा एकत्रित डेटा 'सिस्टम ऑफ सिस्टम्स' तयार करतो. मात्र, एकच कॅमेरा हॅक झाला, तर संपूर्ण कमांड सेंटर धोक्यात येऊ शकतो. गाझियाबाद प्रकरणात हे स्पष्ट झाले की, एक हल्ला संपूर्ण नेटवर्कसाठी घातक ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर, CCTV नेटवर्क हे केवळ कायदा-सुव्यवस्थेसाठी नव्हे, तर लष्करी व धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचे ठरते. हे डेटा विश्लेषण, हालचालींचा मागोवा आणि लक्ष्य निश्चितीसाठी 'इंटेलिजन्स वेपन' प्रमाणे कार्य करू शकते. शत्रूराष्ट्राच्या हाती असे नेटवर्क गेल्यास, केवळ माहितीच नव्हे, तर धोरणात्मक फायदा देखील मिळतो. केंद्र सरकार आता काही महत्वाचे पावले उचलण्याच्या तयारीत आहे. १ एप्रिलपासून फक्त STQC प्रमाणित CCTV कॅमेरे विक्रीसाठी परवानगी दिली जाईल. कंपन्यांना हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि सोर्स कोड सरकारी प्रयोगशाळेत तपासणीसाठी सादर करावी लागेल. प्रत्येक कॅमेराची युनिक नोंदणी व ट्रॅकिंग प्रणाली तयार केली जाईल. तसेच, केंद्रीय स्तरावर रिअल-टाइम मॉनिटरिंग, एन्क्रिप्शन, अ‍ॅक्सेस कंट्रोल आणि ऑडिट यंत्रणा अनिवार्य केली जाणार आहेत. देशव्यापी CCTV ऑडिट हा फक्त तात्पुरता उपाय नाही, तर संरचनात्मक बदलाची सुरुवात ठरू शकतो. यामध्ये सर्व कॅमेऱ्यांचे मॅपिंग, अनधिकृत उपकरणांचे हटवणे, एकसंध सुरक्षा मानके तयार करणे, जबाबदारी निश्चित करणे आणि सुरक्षितता व गोपनीयतेचा समतोल राखणे हे मुख्य उद्दिष्ट असेल. भारत डिजिटल आणि स्मार्ट शहरांच्या दिशेने वाटचाल करत आहे, परंतु CCTV नेटवर्क वाढत असताना जनतेची आणि देशाची सुरक्षा यावर विशेष लक्ष देणे अनिवार्य आहे. गाझियाबाद प्रकरणाने स्पष्ट केले की, निरीक्षण यंत्रणा केवळ संरक्षणाचे साधन नाहीत, तर काळजी न घेतल्यास त्या स्वतःच धोका निर्माण करू शकतात. या प्रकरणामुळे CCTV नेटवर्कवर केंद्रीकृत नियंत्रण, सायबर सुरक्षा आणि जबाबदारी निश्चिती यांचा महत्त्व पुन्हा अधोरेखित झाला आहे.

## प्रासंगिक »

### मैत्री

***विनोद आणि अजय यांची खूप चांगली मैत्री होती. ते एकाच वर्गात शिकत होते. विनोद मन लावून शिकायचा पण अजयचे मन मात्र सदैव इकडे तिकडे नेहमीच भरकटलेले असायचे.***

वर्गात शिक्षक शिकवत असताना अजयला वारंवार बोलणी खावी लागायची, तर विनोद नेहमी शाबासकी मिळवायचा. एकदा विज्ञानाच्या तासाला शिक्षकांनी गृहपाठ एका बाजूने लिहायला सांगितले होते. सर्वांनी तसे केले, पण अजयने दोन्ही बाजूंनी लिहिले. शिक्षक रागावले आणि वही पुन्हा लिहायला सांगितली. अजय घाबरला. ते पाहून विनोदने शिक्षकांची परवानगी घेऊन नवीन वही आणली आणि अजयसोबत बसून गृहपाठ पूर्ण करून दिला. मित्राच्या मदतीमुळे अजयला आपली चूक कळली. त्या दिवसापासून त्याने लक्षपूर्वक अभ्यास करण्याची सवय लावली.

**तात्पर्य-** लक्षपूर्वक काम करणे आणि विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करणे या दोन गोष्टी पाळल्यास अनेक संकटावर मात करता येते. तसेच होणारे नुकसान टाळता येते.

मध्य आशियातील तणाव कमी होण्याचे संकेत आणि जागतिक बाजारांतील सकारात्मक वातावरणाचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर स्पष्टपणे दिसून आला. बुधवारी शेअर बाजाराने जोरदार तेजी नोंदवत गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास पुन्हा उंचावला.

# शेअर बाजारात तेजीचा माहोल कायम

प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठी वाढ होत बाजार मजबूत पातळीवर बंद झाला.

मुंबई शेअरबाजाराचा सेन्सेक्स निर्देशांक तब्बल 1205 अंकांनी वाढून 75,273 अंकांवर स्थिरावला. त्याचप्रमाणे राष्ट्रीय शेअरबाजाराचा निफ्टी निर्देशांक 394 अंकांनी वाढत 23,306 अंकांवर बंद झाला. बँकिंग क्षेत्रातील मजबुतीमुळे बँक निफ्टी निर्देशांकातही मोठी उसळी पाहायला मिळाली आणि तो 1102 अंकांच्या वाढीसह 53,708 अंकांवर बंद झाला.

बाजारातील सर्वच क्षेत्रांनी सकारात्मक कामगिरी करत तेजीला हातभार लावला. विशेषतः फायनॅन्शियल्स आणि ऑटो क्षेत्रातील समभागांनी बाजाराला मजबूत आधार दिला. फायनॅन्शियल्स निर्देशांक 574 अंकांनी वाढून 25,056 वर पोहोचला, तर ऑटो निर्देशांक 543 अंकांनी वाढून 25,058 या स्तरावर बंद झाला. याशिवाय कमोडिटीज, एनर्जी, एफएमसीजी, आयटी,



इन्फ्रा, मेटल, ऑईल अँड गॅस, फार्मा आणि रियल्टी या सर्व क्षेत्रांमध्येही सकारात्मक वातावरण पाहायला मिळाले.

वैयक्तिक समभागांच्या कामगिरीकडे पाहिल्यास, अनेक दिग्गज कंपन्यांचे शेअर्स नफ्यात बंद झाले. यामध्ये श्रीराम फायनान्स, अल्ट्राटेक सिमेंट, टायटन, ग्रासिम, बजाज फायनान्स, लार्सन अँड टुब्रो, डॉ. रेड्डीज लॅब्स, अदानी एंटरप्रायझेस, एशियन पेंट्स, इंडिगो, ॲक्सिस बँक, मारुती सुझुकी, आयशर मोटर्स, एसबीआय लाइफ, आयटीसी, एनटीपीसी, रिलायन्स, ओएनजीसी, इन्फोसिस, विप्रो, हिंडाल्को, कोटक बँक, एचडीएफसी लाइफ, सिप्ला, हिंदुस्थान युनिलिव्हर, टाटा स्टील, महिंद्रा अँड महिंद्रा, सन फार्मा आणि भारती एअरटेल या कंपन्यांचा समावेश होता. दुसरीकडे काही समभागांमध्ये घसरणही पाहायला मिळाली. बीईएल, टीसीएस, पॉवरग्रिड कॉर्पोरेशन, टेक महिंद्रा, ऑईल इंडिया, आयजीएल, फॅक्ट, इंडस टॉवर्स आणि ओरॅकल फायनॅन्शियल सर्व्हिसेस यांनी नकारात्मक कामगिरी नोंदवली.

एकूणच, जागतिक सकारात्मक संकेत आणि मध्य आशियातील तणाव कमी होण्याची चिन्हे यामुळे भारतीय शेअर बाजाराने पुन्हा एकदा दमदार पुनरागमन करत गुंतवणूकदारांचा विश्वास दृढ केला आहे. पुढील काही दिवसांत जागतिक घडामोडींवर बाजाराची दिशा अवलंबून राहणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



ओले मूळ भेदी खडकाचें अंग ।
अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे असे काही नाही अवघड ।
नाही कैवाड तोचवरी ॥ध्रु.॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरे गटाचे खासदार फुटणार?

## शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांचा दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्याच्या राजकारणात सध्या अनेक घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरू आहे. यातच उद्धव ठाकरे यांनी नुकतीच शिवसेनेच्या (ठाकरे गट) सर्व खासदारांची एक बैठक बोलावली होती. या बैठकीत राज्यसभेच्या उमेदवारीवरून माजी खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. मात्र, खासदारांच्या बैठकीत असं काही घडलं नसल्याचं स्पष्टीकरण खासदार संजय राऊत यांनी दिलं आहे.**





या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी आज माध्यमांशी बोलताना केलेल्या एका वक्तव्यामुळे ठाकरे गटात खळबळ उडाली आहे.'उबाठा गटाचे खासदार कोणत्यातरी गटात विलीन होण्याची शक्यता आहे', असं मोठं वक्तव्य मंत्री संजय शिरसाट यांनी केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे.

उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीत प्रियंका चतुर्वेदी यांनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचं बोललं जात आहे. याबाबत तुमची प्रतिक्रिया काय? असा प्रश्न पत्रकारांनी मंत्री संजय शिरसाट यांना विचारला. यावर शिरसाट म्हणाले की, "शिवसेना ठाकरे गटात अंतर्गत धूसफूसीच्या अनेक घटना समोर येत आहेत. राज्यसभेची उमेदवारी प्रियंका चतुर्वेदी यांना का दिली नाही, याची कारणं काय आहेत? यावर आम्ही बोलणार नाहीत. तसेच संजय राऊत यांनी राज्यसभेसाठी शरद पवारांचं नाव का सुचवलं? याचेही वेगळे कारणं आहेत. मात्र, ठाकरे गटातील अंतर्गत जी भांडणं सुरू आहेत, ते टोकाला गेले आहेत आणि याचा लवकरच स्फोट होईल", असं मंत्री संजय शिरसाट म्हणाले आहेत.

"खासदारांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणं हा एक भाग आहे. पण मागच्यावेळी जो उठाव झाला होता, त्या उठावाचंही हेच कारणं होतं. मंत्र्यांना न भेटणं, आमदारांना न भेटणं, पदाधिकाऱ्यांना न भेटणं हा त्यांचा जो स्वभाव आहे, त्या स्वभावाला कंटाळूनच काही लोकांनी उठाव केला. आताही त्याच हालचाली केंद्रात खासदारांच्या सुरू आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी बैठक घेतली असावी. पण लवकरच हे खासदार कोणाच्यातरी गटात विलीन होतील अशी शंका उपस्थित होत आहे", असं मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.


### ऑपरेशन टायगरच्या हालचाली


शिवसेनेचं (शिंदे) ऑपरेशन टायगर लवकरच होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. या प्रश्नावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, "याबाबत मला कल्पना नाही. मात्र, आमच्याकडे जे येतात त्यांची योग्यता पाहून एकनाथ शिंदे निर्णय घेतात. एकनाथ शिंदे हे कार्यकर्त्यांना जपणारे नेते आहेत. त्यामुळे अनेक पक्षाचे नेते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. यामध्ये ठाकरे गटाचे खासदारही येतील अशी शक्यता नक्की आहे", असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

## भोंदूबाबा प्रकरणातील पीडितांचे व्हिडिओ व्हायरल करणे महागात, दोघांना अटक

**महाईन्यूज । नाशिक**

**राज्यभर खळबळ उडवणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात याने लैंगिक अत्याचार केलेल्या गुन्ह्यातील पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती समाज माध्यमावर प्रसारित करणाऱ्या तिघांविरुद्ध कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील दोघांना अहिल्यानगर पोलिसांनी अटक करण्यात आली आहे. एकाचा शोध पोलिस घेत आहेत.**





भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. राहुल गंगाधर शिंदे (रा. कोपरगाव) व योगेश पंढरीनाथ आढाव (रा.कोपरगाव) या दोघांना अटक करण्यात आली तर तिसरा आरोपी बीड जिल्ह्यातील आहे. त्याचा शोध सुरू आहे.

भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरुद्ध महिलांवरील अत्याचाराचे नाशिकमधील सरकारवाडा पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. या गुन्ह्यातील पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती कोपरगावमधील 'बीएमडब्ल्यू' या व्हाट्सअप ग्रुपवर राहुल शिंदे याने प्रसारित केल्या. नंतर या चित्रफीती योगेश आढाव याने बीड जिल्ह्यातील तरुणाला पाठवल्या, असे तपासात निष्पन्न झाले आहे.

यावरून तिघांविरुद्ध कोपरगाव पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संवेदनशील व गंभीर गुन्ह्यात अनेक महिला पीडित असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने त्यांची ओळख उघड होणार नाही, याची खबरदारी घेऊन तपास करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत कोणाकडेही पीडित महिलेची ओळख, तिच्या नातेवाईकांची ओळख, तिच्या घराची ओळख, तिच्या कुटुंबीयांची ओळख उघड होईल अशा चित्रफिती असल्यास त्यांनी त्या काळ नष्ट कराव्यात व प्रसारमाध्यमावर प्रसारित करू नये, असे आवाहन विशेष तपास पथकाने केले आहे.


अशा ओळख उघड होणाऱ्या चित्रफिती प्रसारित केल्यास संबंधितांवर व प्रसारमाध्यमाच्या 'ग्रुप ॲडमिन'वर गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना अटक करण्याची कायदेशीर कारवाई केली, जाईल असेही विशेष तपास पथकाने पत्रकात नमूद केले आहे.

# इराणची अमेरिका-इस्रायला नवी धमकी!

## बाब अल-मंदेब सामुद्रधुनी रोखणार; आंतरराष्ट्रीय वाहतुकीत अडथळ्यांची शक्यता

महाईन्यूज । इराण

**अमेरिका आणि इस्रायलने खार्गसह इराणच्या इतर बेटांवर हल्ला करून युद्ध पुढे वाढवल्यास, बाब अल-मंदेब सामुद्रधुनी रोखणार असा धमकी वजा इशारा इराणने दिला आहे. सुएझ कालव्याकडे जाणाऱ्या सागरी वाहतुकीवर नियंत्रण ठेवणारा बाब अल-मंदेब सामुद्रधुनी अत्यंत महत्वाचा असा अरुंद जलमार्ग आहे. जगातील चौथ्या क्रमांकाचा हा सागरी मार्ग असून, एक पंचमांश तेलाची वाहतूक याच मार्गातून होते. त्यामुळे बाब अल-मंदेबमध्ये कोणताही व्यत्यय निर्माण जगाच्या अर्थकारणावर मोठा परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे.**




### जागतिक अर्थव्यवस्था कोलमडण्याची भीती

"इराणच्या खर्ग बेटावर ताबा मिळवण्याची शत्रू तयारी करत आहेत. पण, असा कोणताही प्रयत्न झाला, तर त्या शत्रूला मदत करणाऱ्या प्रदेशातील सर्व पायाभूत सुविधांवर इराण भीषण हल्ले करणार", इशारा इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाखेर कालीबाफ यांनी दिला आहे. दरम्यान, इराणने 'हॉर्मुझ' पाठोपाठ 'बाब अल-मंदेब' ही सामुद्रधुनी बंद केल्यास, जगाला इतिहासातील सर्वात मोठ्या तेल संकटाचा सामना करावा लागू शकतो. यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किमतीत प्रचंड वाढ होऊन जागतिक अर्थव्यवस्था कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बाब अल-मंदेब लाल समुद्र आणि एडनचे आखात यांना जोडणारा प्रमुख मार्ग आहे. हा मार्ग कुत्रिम सुएझ कालव्याकडे जाणाऱ्या वाहतुकीचे नियंत्रण करतो. जगातील एकूण सागरी तेल वाहतुकीपैकी सुमारे १२ टक्के तेलाची वाहतूक याच मार्गावरून केली जाते. त्यामुळे हा मार्ग बंद झाल्यास जागतिक व्यापार आणि इंधन पुरवठ्याला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

"शत्रूला आमच्या जमिनीवर हल्ला करायचा आहे अथवा बेटांवर हल्ला करायचा झाल्यास त्याची त्यांना किंमत मोजावी लागेल. आमचे नौदल पर्शियन गल्फ आणि ओमान समुद्राच्या दिशेने कूच करेल", असे इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या हवाल्याने इराणच्या तासनीम या वृत्तसंस्थेने वृत्त प्रसिद्ध केले आहे. "आमच्याकडून अचानक घेण्यात आलेल्या निर्णयाचा त्यांना मोठा फटका बसेल", असे इशारा रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने दिल्याचे वृत्तात म्हटले आहे.

फार्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, येमेनमधील इराण-समर्थित हूती बंडखोर या लढाईत सामील होण्याची शक्यता आहे. हूती बंडखोर आधीच लाल समुद्रात जहाजांवर हल्ले करत आहेत. आता ते इराणला 'बाब अल-मंदेब'वर ताबा मिळवण्यासाठी मदत करू शकतात, ज्यामुळे अमेरिकन आणि इस्रायली सैन्याची कोंडी होऊ शकते. या समुद्रधुनीला अडथळा निर्माण करण्याची क्षमता केवळ इराणमध्ये असल्याचा दावा देखील या वृत्तात करण्यात आला आहे.

# केजरीवाल म्हणजे दिल्लीचे रेहमान डकैत; भाजपा-आपमध्ये 'धुरंधर' खडाजंगी

महाईन्यूज । नवी दिल्ली

**दिल्ली विधानसभेत बुधवारी रोजी जोरदार गदारोळ झाल्याचे पाहायला मिळाले. दिल्ली सरकारमधील मंत्री प्रवेश साहिब सिंह वर्मा यांनी माजी मुख्यमंत्री अदविंद केजरीवास यांच्या शासकीय निवासस्थानावर झालेल्या खर्चावरून गंभीर आरोप केले. त्यांनी सभागृहात एक मोठी यादी सादर करत या 'शीशमहल' सारख्या घरात अत्यंत महागडे आणि लक्झरी सामान वापरण्यात आल्याचा आरोप केला.**



इतकेच नाही तरी दिल्ली विधानसभेत बोलताना प्रवेश वर्मा यांनी आपल्या भाषणात आम आदमी पक्षाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री केजरीवाल यांची तुलना 'रहमान डकैत'शी केली. दिल्लीतील ६, फ्लॅगस्टाफ रोड येथील मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या नूतनीकरणासंदर्भातील कॅगच्या अहवालावर दिल्ली विधानसभेत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान ही टिप्पणी केली.

भाजपा नेते वर्मा यांनी 'धुरंधर' चित्रपटातील पात्राशी अरविंद केजरीवाल यांची तुलना करताना म्हणाले की, "हे अगदी 'रहमान डकैत'च्या प्रसंगासारखेच होते. लोक अडचणीत असताना, जनतेचा पैसा लुटला जात होता." पुढे बोलताना प्रवेश वर्मा म्हणाले, "देशात 'धुरंधर' नावाचा एक नवीन चित्रपट प्रदर्शित झाला आहे, ज्याची खूपच चर्चा होत आहे. त्यामधील 'रहमान डकैत' या एका पात्राचीही खूप चर्चा होत आहे. अरविंद केजरीवाल हे दिल्लीचे डकैत होते, ज्यांनी दिल्लीच्या पैशांवर दरोडा टाकला. आता केजरीवालजी काहीही बोलले तरी, फक्त दिल्लीतीलच नाही तर देशातील प्रत्येक व्यक्ती म्हणतो की ते खोटेच असेल."

प्रवेश वर्मा यांनी दावा केला की मुख्यमंत्री निवासस्थानी बसवण्यात आलेल्या जिमच्या उपकरणांपासून ते फर्निचर आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंपर्यंत प्रत्येक गोष्ट अत्यंत महागडी आहे. ते म्हणाले की, एका ट्रेडमिलची किंमत सुमारे १४ लाख रुपये होती आणि त्यासाठी स्वतंत्र ट्रेनरलाही पैसे देण्यात आले. याव्यतिरिक्त, डंबेल सेटवर जवळपास ३ लाख रुपये खर्च करण्यात आले.

त्यांनी सांगितले की, घरात ८८ इंचाचा मोठा टीव्ही बसवला गेला. तसेच तीन टीव्ही बसवण्यासाठी त्यावर एकूण २७ लाख रुपये खर्च झाले. याशिवाय चिमणी, सोफा, मिनी बार आणि एंट्रन्स लाइट सारख्या सोयी देखील बसवण्यात आल्या. प्रवेश वर्मा यांनी फर्निचरवर झालेल्या खर्चाबद्दल बोलताना सांगितले की, सोफा सेटचे दोन टेंडर काढले गेले, एक ३५ लाख रुपयांचे आणि दुसरे १,५ लाख रुपयांचे.

मंत्री पुढे म्हणाले की, त्यांच्या घरात ७६ टेबल लावण्यात आले, ज्यावर जवळपास १ कोटी पाच लाख रुपये खर्च झाले. याशिवाय ८ बेडवर ४० लाख रुपये खर्च करण्यात आला. तर खुर्च्यांवर ६० लाख रुपयेआणि कन्सोलवर ५० लाख रुपये खर्च केले गेले. त्यांनी सांगितले की घरात १.५ कोटी रुपयांचे पडदे बसवण्यात आले होते.

वर्मा यांनी दावा केला की याशिवाय घरात ६० लाख रुपयांचे कार्पेट आणि छोटे पफी (सोफ्याबरोबर ठेवण्यात येणारा छोटे स्टूल) देखील विकत घेण्यात आले. तसेच एक मोठा डायनिंग टेबल बसवण्यात आला, ज्यावर २८ लोक बसू शकतात, ज्याची किंमत १४ लाख रुपये आहे. याशिवाय जिममध्ये स्पिन बाइक १ लाख रुपयांची , फ्यूजन क्रेस्ट मशीन ३ लाख रुपयांची आणि बॉडी सॉलिड उपकरण ६ लाख रुपयांचे बसवण्यात आले.

त्यांनी पुढे सांगितले की, घरात जवळपास १२ लाख रुपयांचे इलेक्ट्रिकल आयटम आणि १४ लाख रुपयांचे सीलिंग डेकोरेटिव्ह फिटिंग्ज बसवण्यात आली होती. त्यांनी असाही दावा केला की घरात एकूण ११ टीव्ही होते, ज्यावर दीड कोटी रुपये खर्च झाले. तसेच बारबेक्यू यूनिट, सीलिंग स्पीकर, कॅमेरा, ॲम्प्लिफायर, प्री-एम्प्लिफायर सारखे महागडे उपकरण देखील होते.

# किआरा अडवाणीचा स्टायलिश अंदाज



अभिनेत्री किआरा अडवाणी नेहमीच तिच्या स्टायलिश लूकमुळे चर्चेत असते. आई झाल्यानंतर किआराच्या चेहऱ्यावरील ग्लो अधिकच वाढला आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये तिने मुलगी सरायाहला जन्म दिला. त्यानंतर तिने मातृत्व आणि कुटुंबाला प्राधान्य देत अभिनयातून ब्रेक घेतला होता. आता तिने पुन्हा एकदा कामाला सुरुवात केली असून, अलीकडेच तिने एका कार्यक्रमाला हजेरी लावली होती. ज्यात तिचा क्लासी सुंदर लुक अनेकांच्या पसंतीस पडला आहे.किआराने या इव्हेंटसाठी गडद ब्राऊन रंगाचा लेदर ड्रेस परिधान केला आहे. ज्यात तिचा लूक बोल्ड आणि मोहक दिसत आहे. रेड कारपेटवर किआरा येताच तिने एका पेक्षा एक पोज देत सर्वांचे लक्ष वेधले. सध्या तिचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, किआरा अडवाणी अलीकडेच हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर यांच्यासोबत 'वॉर २' या चित्रपटात दिसली होती. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. किआराचा पुढील चित्रपट, 'टॉक्सिक: अ फेअरी टेल फॉर ग्रोन-अप्स'ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट मूळतः ४ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. या ॲक्शन ड्रामामध्ये यश मुख्य भूमिकेत दिसणार असून, यात नयनतारा, रुक्मिणी वसंत, हुमा कुरेशी आणि तारा सुतारिया यांच्याही भूमिका आहेत.



# 'लापता लेडिज' फेम अभिनेत्री प्रेमात?

लापता लेडीज या चित्रपटामुळे अभिनेत्री प्रतिभा रांता रातोरात स्टार झाली. या चित्रपटानंतर तिच्या चाहत्यांची संख्या वाढली. आता ती बॉलिवूडमधील एका अभिनेत्याच्या प्रेमात पडली असल्याची चर्चा रंगली आहे. फिल्मफेअरच्या वृत्तानुसार, प्रतिभा आणि बॉलिवूड अभिनेता रोहित सराफ एकमेकांच्या प्रेमात पडले असल्याचे बोलल जात आहे. हे दोन्ही कलाकार सध्या एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. "प्रतिभा आणि रोहित एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेत आहेत. ते खूप चांगले मित्र आहेत आणि त्यांच्यात खूप जवळीकता आहे. ते अनेकदा एकत्र वेळ घालवतात. त्यांच्यात एक नैसर्गिक स्नेह आणि सहजता आहे, पण ते आपल्या नात्याला लगेच नाव देण्याची घाई करत नाहीत." असे वृत्त देण्यात आले आहे.मात्र, हे लक्षात घेण्यासारखे आहे की रोहित सराफ किंवा प्रतिभा रांता या दोघांनीही डेटिंगच्या अफवांना अद्यापर्यंत दुजोरा देणारे किंवा नाकारणारे कोणतेही निवेदन जारी केलेले नाही. रोहित सराफचे चाहते त्याला अनेकदा प्राजक्ता कोळीसोबत जोडत आहेत. दरम्यान, रोहित आणि प्रतिभा यांच्या नात्याच्या अफवा बऱ्याच काळापासून पसरत आहेत. या सगळ्याची सुरुवात गेल्या वर्षी झाली, जेव्हा ते निर्माते निखिल अडवाणीच्या दिवाळी पार्टीत एकत्र दिसले होते.

# 'ऑपरेशन सिंदूर' चित्रपटाची घोषणा

द कश्मीर फाइल्स , द ताश्कंद फाइल्स, द बंगाल फाइल्स या गाजलेल्या चित्रपटांनंतर आता दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी त्यांच्या नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. गुरुवार, २५ मार्च रोजी त्यांनी आपल्या सोशल मीडियाद्वारे या आगामी चित्रपटाबद्दलची माहिती दिली.

विवेक अग्निहोत्री आणि भूषण कुमार यांनी गुरुवार, २५ मार्च रोजी त्यांच्या नवीन चित्रपटाची घोषणा केली, ज्याचं नाव आहे 'ऑपरेशन सिंदूर'. २०२५ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या लष्करी हल्ल्याच्या सत्यघटनेवर हा चित्रपट आधारित आहे. लेफ्टनंट जनरल के.जे.एस. 'टिनी' ढिल्लन यांच्या 'ऑपरेशन सिंदूर: द अनटोल्ड स्टोरी ऑफ इंडियाज डीप स्ट्राईक्स इनसाईड पाकिस्तान' या पुस्तकावर या चित्रपटाची कथा आधारित आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विवेक अग्निहोत्री करणार असून भूषण कुमार यांची 'टी-सीरीज' आणि विवेक अग्निहोत्री यांची 'आय एम बुद्धा प्रोडक्शन्स' संयुक्तपणे या चित्रपटाची निर्मिती करणार आहे. या चित्रपटाबद्दल भूषण कुमार यांनी म्हटले, "काही कथा आपण निवडत नाही, तर त्या कथाच आपल्याला निवडत असतात, 'ऑपरेशन सिंदूर' ही त्यापैकीच एक आहे. २०२५ मध्ये पहलगाममध्ये झालेल्या घटनेत निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. यावर 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे भारताने चोख प्रत्युत्तर दिले होते. ही गोष्ट जगासमोर येणे आवश्यक आहे. हा केवळ चित्रपट नसून देशाच्या इतिहासातील एका मोठ्या घटनेचा दस्तऐवज आहे." तर दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनीसुद्धा याबद्दल प्रतिक्रिया दिली. "या चित्रपटाच्या माध्यमातून भारताने केवळ पहलगाम हल्ल्याचा बदला घेऊन पाकिस्तानला शिक्षा दिली नाही, तर आधुनिक युद्धशास्त्रातील आपली ताकदही जगाला दाखवून दिली. या मोहिमेत नेमके काय, कसे आणि का घडले हे समजून घेण्यासाठी भारतीय सशस्त्र दलाच्या विविध विभागांच्या सहकार्याने संशोधन करण्यात आले आहे. लोकांपर्यंत पोहोचलेल्या माहितीपेक्षा ही वस्तुस्थिती खूपच अस्वस्थ करणारी आहे" असे त्यांनी म्हटले. पुढे विवेक अग्निहोत्री 'हा चित्रपट प्रेक्षकांना एक थरारक अनुभव देईल. तसेच तथ्यांच्या आधारे सत्य समोर आणण्याचा प्रयत्न ते या चित्रपटाच्या माध्यमातून करणार आहेत', असेही म्हणाले.



# आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द!

## स्पर्धेला सुरूवात होण्याआधी बीसीसीआयने घेतला सर्वात मोठा निर्णय

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**जगातील सर्वात मोठी क्रिकेट लीग स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. या स्पर्धेला २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ बलाढ्य सनरायझर्स हैदराबाद संघाचा सामना करताना दिसून येणार आहे. हा सामना बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. पण या सामन्याआधी बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. स्पर्धेला सुरूवात होण्याआधी ओपनिंग सेरेमनीत कुठलाही धुमधडाका किंवा जल्लोष केला जाणार नाही.**





रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला आपलं पहिलं जेतेपद मिळवण्यासाठी १८ वर्ष वाट पाहावी लागली. आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जला पराभूत करून पहिल्यांदाच जेतेपदाची ट्रॉफी उंचावली. त्यामुळे खेळाडू दुसऱ्याच दिवशी अहमदाबादहून बंगळुरूत दाखल झाले होते. पण हा ऐतिहासिक दिवस बंगळुरू संघासाठी ब्लॅक डे ठरला. विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी क्रिकेट चाहत्यांनी चिन्नास्वामी मैदानात हजारोंच्या संख्येने गर्दी केली. तर मैदानाबाहेर त्याहून जास्त लोकांनी गर्दी केली होती. दरम्यान परिस्थिती हाताबाहेर गेल्याने चेंगराचेंगरीची घटना घडली. या घटनेत ११ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. ज्यात १४ वर्षांच्या चिमुकल्याचाही समावेश होता.

या घटनेत जीव गमावलेल्या ११ पीडितांप्रती संवेदनशीलता, आठवण आणि आदर व्यक्त करण्यासाठी बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. दरवर्षी आयपीएल स्पर्धेतील पहिल्या सामन्याआधी रंगारंग कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पण यावेळी कुठल्याही कार्यक्रमाशिवाय आरसीबी विरूद्ध हैदराबाद सामन्याची सुरूवात केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, “गेल्या वर्षी ४ जूनला घडलेल्या दु:खद घटनेमुळे आयपीएल स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कुठल्याही कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार नाही. आयपीएलच्या सुरूवातीला कुठल्याही सांस्कृतिक किंवा मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार नाही.” तर स्पर्धेतील अंतिम सामन्यावेळी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती देवजित सैकिया यांनी दिली आहे.

# IPL नंतर क्रिकेटचा महाकुंभ! ४ देश, ५ महिने अन् २२ सामने

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**येत्या २८ मार्चपासून आयपीएल २०२६ स्पर्धेला सुरूवात होणार आहे. त्यामुळे सर्व भारतीय खेळाडू ही स्पर्धा खेळण्यात व्यस्त आहेत. या २ महिन्यांच्या कालावधीत भारतीय खेळाडू कुठलीही द्विपक्षीय मालिका खेळताना दिसून येणार नाहीत. पण ही स्पर्धा झाल्यानंतर एकापाठोपाठ एक मालिका असणार आहेत. बीसीसीआयने २०२६-२७ मध्ये मायदेशात होणाऱ्या मालिकांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यादरम्यान वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वे आणि ऑस्ट्रेलिया हे ४ संघ भारत दौऱ्यावर येणार आहेत.**



भारतातील हंगामाची भारत विरूद्ध वेस्ट इंडिज यांच्यात होणाऱ्या मालिकेने होणार आहे. २७ सप्टेंबरपासून दोन्ही संघांमध्ये ३ वनडे आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. वनडे मालिकेतील सामने गुवाहाटी, न्यू चंडीगड आणि तिरुवनंतपुरममध्ये खेळवले जाणार आहेत. तर टी-२० मालिकेतील सामने लखनौ, रांची, इंदूर, बंगळुरू आणि हैदराबाद या ५ शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत.

वेस्ट इंडिजविरूद्धची टी-२० आणि वनडे मालिका झाल्यानंतर श्रीलंकेचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. वनडे मालिकेतील सामने बंगळुरू, दिल्ली आणि अहमदाबादमध्ये खेळवले जाणार आहेत. तर टी-२० मालिकेतील सामने कटक, राजकोट आणि पुण्यात खेळवले जाणार आहेत. श्रीलंकेविरूद्धची मालिका झाल्यानंतर झिम्बाब्वेचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे.

वर्ल्डकप २०२७ स्पर्धेआधी भारतीय संघ मायदेशात ऑस्ट्रेलियाचा सामना करणार आहे. दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची बॉर्डर-गावसकर कसोटी मालिका खेळवली जाणार आहे.

### भारत- वेस्ट इंडिज मालिकेचं वेळापत्रक

| | |
|---|---|
| पहिला वनडे: | २७ सप्टेंबर, तिरुवनंतपुरम |
| दुसरा वनडे: | ३० सप्टेंबर, गुवाहाटी |
| तिसरा वनडे: | ३ ऑक्टोबर, न्यू चंदीगड |
| पहिला टी-२०: | ६ ऑक्टोबर, लखनऊ |
| दुसरा टी-२०: | ९ ऑक्टोबर, रांची |
| तिसरा टी-२०: | ११ ऑक्टोबर, इंदूर |
| चौथा टी-२०: | १४ ऑक्टोबर, हैदराबाद |
| पाचवा टी-२०: | १७ ऑक्टोबर, बंगळुरू |

### भारत-श्रीलंका दौऱ्याचं संपूर्ण वेळापत्रक

| | |
|---|---|
| पहिला वनडे सामना- | १३ डिसेंबर, दिल्ली |
| दुसरा वनडे सामना- | १६ डिसेंबर, बंगळुरू |
| तिसरा वनडे सामना- | १९ डिसेंबर, अहमदाबाद |
| पहिला टी-२० सामना- | २२ डिसेंबर, राजकोट |
| दुसरा टी-२० सामना- | २४ डिसेंबर, कटक |
| तिसरा टी-२० सामना- | २७ डिसेंबर, पुणे |

### भारत- झिम्बाब्वे वनडे मालिकेचं वेळापत्रक

| | |
|---|---|
| पहिला वनडे सामना - | ३ जानेवारी, २०२७, कोलकाता |
| दुसरा वनडे सामना - | ६ जानेवारी, २०२७, हैदराबाद |
| तिसरा वनडे सामना- | ९ जानेवारी, २०२७, मुंबई |

### भारत- ऑस्ट्रेलिया बॉर्डर गावसकर कसोटी मालिकेचं वेळापत्रक

| | |
|---|---|
| पहिली कसोटी: | २१ ते २५ जानेवारी २०२७, नागपूर |
| दुसरी कसोटी: | २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी, चेन्नई |
| तिसरी कसोटी: | ११ ते १५ फेब्रुवारी, गुवाहाटी |
| चौथी कसोटी: | १९ ते २३ फेब्रुवारी, रांची |
| पाचवी कसोटी: | २७ फेब्रुवारी ते ३ मार्च, अहमदाबाद |

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज

epaper.mahaenews.com

ePaper

। शुक्रवार ।
दि. 27 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# शिवकालीन परंपरेचा गौरव : "दुर्गवेध ३.०" बक्षीस वितरण

## शिक्षण विश्व : किल्ला बनविणे स्पर्धा, रीळ स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, षोडसूत्र स्पर्धा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) निगडी येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि युनिट ए – ०५३ यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा, शौर्य आणि दूरदृष्टी या विषयावर आधारित "दुर्गवेध ३.०" या आंतर महाविद्यालयीन भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.**





या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइचे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, एसडीडब्ल्यू प्रमुख डॉ. पद्माकर देशमुख, असोसिएट प्रमुख प्रा. राजकमल सांगोले, समन्वयक व एनएसएस विभाग अधिकारी डॉ. संदीप जगदाळे आदी उपस्थित होते त्यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. या वेळी किल्ला बनविणे स्पर्धा, रीळ स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, षोडसूत्र स्पर्धा, दुर्ग रहस्य स्पर्धा मधील विजेत्यांना रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी एनएसएस स्वयंसेवकांनी शौर्य आणि नेतृत्व करणारी ऐतिहासिक एक नाटिका व पारंपारिक लेझीम सादर केले. किल्ला प्रदर्शन या स्पर्धा ऐतिहासिक किल्ल्यांच्या स्थापत्य प्रतिमा, धोरणात्मक नियोजन आणि अभियांत्रिकी उत्कृष्टता यावर आधारित होत्या.

### स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे...

किल्ला बनवणे परीक्षक फेरी प्रथम क्रमांक – टीम शिलेदार, द्वितीय क्रमांक – टीम शिवतेज आणि तृतीय क्रमांक – टीम शिका क्षितिज आणि टीम शक्ती यांना रोख १५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. किल्ला बनविणे प्रेक्षक व सार्वजनिक मतदान फेरी मध्ये प्रथम क्रमांक – टीम शौर्यसेना, द्वितीय क्रमांक टीम – शिवद्रग्ज आणि तृतीय क्रमांक टीम – मावळे यांना रोख १० हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. षोडसूत्र स्पर्धेत प्रथम क्रमांक – टीम सिंधुदुर्ग स्टॉर्म्स (वेणू मोरे, पंकज भगत, सोहम शहापुरे, भूमी मुथा), द्वितीय क्रमांक – टीम शिवनेरी शिलेदार (महेश महादू आव्हाड, सुयोग सुहास जाधव, प्रतीक भागवत जाधव) आणि तृतीय क्रमांक – टीम धुरंदर (शामल दिघोळे, निष्ठा पारवे, अपूर्व सगरे, आदर्श भुशिंगे) यांना रोख ८ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. दुर्ग रहस्य स्पर्धेत प्रथम क्रमांक – संघ स्वराज्य, द्वितीय क्रमांक – चकार शिवबाचे आणि तृतीय क्रमांक टीम – एसपीडीपी यांना रोख ४,५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. रांगोळी स्पर्धेतील प्रथम क्रमांक – चंचल वर्मा, द्वितीय क्रमांक – सिद्धिका पुजारी, स्नेहा माळी आणि तृतीय क्रमांक – अदिती बंडगर यांना रोख ४,५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. रीळ बनवणे स्पर्धेत प्रथम क्रमांक – समर्थ पाटील, द्वितीय क्रमांक – युवराज चिलवंत आणि तृतीय क्रमांक – अथर्व राऊत यांना रोख ४,५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

# महापालिकेची कर वसुलीत मोठी झेप : ८६० कोटींचा टप्पा पार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत चालू आर्थिक वर्षात (दि. १ एप्रिल २०२५ ते २४ मार्च २०२६) तब्बल ८६० कोटी ५९ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद, कर संकलन विभागाचे नियोजनबद्ध कामकाज, विविध सवलतींची प्रभावी अंमलबजावणी तसेच ऑनलाइन व ऑफलाइन सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे.**






कर भरण्यास चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल महापौर रवि लांडगे यांनी सर्व करदात्यांचे आभार मानले असून, ज्या थकबाकीदार नागरिकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही त्यांनी अभय योजनेचा लाभ घेऊन तात्काळ कर भरणा करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

थकबाकीदार नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेमार्फत अभय योजना लागू करण्यात आली असून या योजनेअंतर्गत दि. १ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत थकीत मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरल्यास विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे ५ दिवस शिल्लक राहिले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात सध्या निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक व इतर मिळून सुमारे ७ लाख ३२ हजार मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ५ लाख ७२ हजार ९०२ मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे. दरवर्षी कर भरणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत असून नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. तथापि, ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप कर भरलेला नाही, अशा थकबाकीदारांवर कर संकलन विभागामार्फत नियमानुसार जप्ती तसेच नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई करण्यात येत आहे. अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

> कर संकलन विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने केलेल्या कामकाजामुळे आणि नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या सुलभ सुविधांमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे. अभय योजनेअंतर्गत दिली जाणारी ९० टक्के सवलत ही नागरिकांसाठी मोठी संधी असून, थकबाकीदारांनी या कालावधीत कर भरून दंडमाफीचा लाभ घ्यावा. तसेच कर न भरणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे.
>
> – **डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> पिंपरी चिंचवडकर नागरिकांनी महापालिकेच्या विकासकामांना साथ देत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर भरून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ही बाब शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या नागरिकांकडे थकबाकी आहे त्यांनी अभय योजनेचा लाभ घेऊन विलंब दंडात मिळणाऱ्या सवलतीचा लाभ घ्यावा आणि आपला कर तात्काळ भरावा.
>
> – **रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# मोशी हॉस्पिटलसाठी केंद्र शासनाचा ४१ कोटींचा निधी!

## भाजपा नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांची वस्तुनिष्ठ माहिती



## राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या डोळ्यांत अंजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथे उभारण्यात येणारे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील आरोग्य क्षेत्रासाठी संजीवनी आहे. हजारो लोकांना या ठिकाणी अत्याधुनिक उपचार घेण्याची सुविधा निर्माण होत आहे. या प्रकल्पाची संकल्पना आणि पाठपुरावा आमदार महेश लांडगे यांनी केला. त्यांनी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेतून आतापर्यंत ४१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.**




त्यामुळे आमदारांनी किती निधी आणला? असा निराधार दावा करणाऱ्यांनी आत्मचिंतन करावे, अशी ठाम भूमिका मोशी प्रभाग क्रमांक २ मधील भाजपाचे नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी मांडली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने मोशी येथे ७०० बेडचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारले जात आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारला जात आहे. मात्र, आमदारांनी किती निधी राज्य शासनाकडून आणला? असा प्रश्न राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेत उपस्थित केला होता. त्याला भाजपाचे नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

महापालिका सभागृहात बोलताना विरोधी पक्षाचे नगरसेवक सातत्याने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण", वेस्ट एनर्जी म्हणजे कचऱ्यापासून वीज निर्मिती आणि मोशी येथील ७०० बेडचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल अशा प्रकल्पांबाबत बिनबुडाचे आरोप करीत असतात. यामुळे शहराची बदनामी होते आहे. या भागाचा स्थानिक नगरसेवक म्हणून अशा निराधार आरोपांना जशास तसे उत्तर देणे क्रमप्राप्त आहे, असेही निखिल बोऱ्हाडे यांनी म्हटले आहे.

निखिल बोऱ्हाडे म्हणाले की, मोशी हॉस्पिटलसाठी आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला.त्यानंतर राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून निधीही मंजूर करुन घेतला. सदर जागा ही राज्य शासनाच्या अधिकारात होती. ती महानगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यासाठीही पाठपुरावा करण्यात आला. आता या प्रकल्पासाठी आतापर्यंत ४१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला. आगामी काळात आणखी निधी उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिका सभागृहात स्वत: ज्येष्ठ आणि अनुभवी समजणारे नगरसेवक आहेत. अनेकजन टीडीआर, एसआरए, बिल्डिर, ठेकेदार त्यांच्यासोबत पार्टनरशीप करतात. त्यामुळे नगरसेवकपदाचा वापर कुणावर बिनबुडाचे आरोप करण्यासाठी करु नये. यापुढील काळात कोणी बिनबुडाचे आरोप करीत असतील, प्रशासकीय काळातील कामे आणि आमदार-खासदारांवर आरोप करीत आहेत. त्यांना सर्व माहिती जमा करुन आरसा दाखवण्यात येईल. शहरात सुरू असलेल्या मोठ्या प्रकल्पांबाबत बिनबुडाचे आरोप करुन शहराची बदनामी करणाऱ्यांविरोधात या पुढील काळात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला पाहिजे. त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल.
>
> **– निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक, मोशी प्रभाग-२, भाजपा.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये ५ सार्वजनिक ग्रंथालयांना मुदतवाढ प्रस्ताव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. शहरातील शाहूनगर, संभाजीनगर, आकुर्डी, संत तुकारामनगर आणि केशवनगर-चिंचवड येथील एकूण पाच सार्वजनिक ग्रंथालयांची विद्यमान मुदत संपुष्टात आल्याने या ग्रंथालयांना पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे.**

महापालिका सभा ठराव क्र. ६२७ दिनांक १० फेब्रुवारी २०१५ नुसार, महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणारी सर्व सार्वजनिक ग्रंथालये संबंधित प्रभागातील जेष्ठ नागरिक संघ, महिला बचत गट तसेच स्थानिक संस्था व मंडळे यांच्याकडे चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या संस्थांना प्रत्येक ग्रंथालयासाठी दरमहा रुपये १०,००० मानधन देण्यात येते. त्यानुसार वरील पाचही ग्रंथालये मागील कालावधीत ११ महिन्यांच्या करारावर चालविण्यात आली होती.

सद्यस्थितीत या ग्रंथालयांची मुदत पूर्ण झाल्याने ती अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक ठरले आहे. महानगरपालिकेच्या सार्वजनिक ग्रंथालय विभागाकडे कर्मचारी संख्या अपुरी असल्यामुळे ग्रंथसंपदेचे जतन करणे व नागरिकांना नियमित वाचन सेवा उपलब्ध करून देणे या दृष्टीने स्थानिक संस्थांची मदत महत्त्वाची ठरत आहे. या प्रस्तावानुसार संबंधित पाचही ग्रंथालयांना पुन्हा ११ महिन्यांच्या कालावधीसाठी त्याच अटी व शर्तींवर आणि प्रती ग्रंथालय दरमहा रुपये १०,००० मानधनावर चालविण्यास देण्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात येणार आहे. यासाठी होणाऱ्या खर्चासही स्थायी समितीची मंजुरी घेणे अपेक्षित आहे.



क्रीडा व सांस्कृतिक समिती सदस्य नगरसेवक योगेश लांडगे म्हणाले की, "शहरातील वाचन संस्कृती जपण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना ज्ञानसंपदेचा लाभ मिळावा यासाठी सार्वजनिक ग्रंथालये सतत सुरू राहणे अत्यावश्यक आहे. स्थानिक संस्थांच्या सहभागामुळे ही सेवा अधिक प्रभावीपणे दिली जात आहे," असे त्यांनी नमूद केले. या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर शहरातील वाचनप्रेमींना अखंडित सेवा मिळत राहणार असून, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ग्रंथालय व्यवस्थापनाचा उपक्रम अधिक बळकट होणार आहे.

> शहरातील वाचनसंस्कृती टिकवणे आणि नागरिकांना ज्ञानसंपदेचा अखंडित लाभ मिळवून देणे हा आमचा प्राथमिक उद्देश आहे. पाचही सार्वजनिक ग्रंथालयांना मुदतवाढ देण्याच्या निर्णयामुळे स्थानिक संस्थांच्या सहभागातून सेवा अधिक प्रभावीपणे चालेल, आणि नागरिकांना वाचनासाठी नियमित सुविधा उपलब्ध राहतील. आम्ही या उपक्रमाला पूर्ण पाठिंबा देत आहोत आणि नागरिकांसाठी उत्तम वाचनसुविधा सुनिश्चित करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहू.
>
> **– योगेश लांडगे, सदस्य, क्रीडा व सांस्कृतिक समिती.**

# चिंचवडच्या चापेकर संग्रहालयासाठी देखभाल सेवेला मुदतवाढ

## महापालिका क्रीडा समिती सदस्य उदय गायकवाड यांची सविस्तर माहिती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतीकारक चापेकर बंधू यांच्या स्मृती जतन करण्यासाठी चिंचवडगाव येथे उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालयाच्या स्वच्छता, देखभाल व देखरेख कामकाजासाठी नियुक्त मनुष्यबळास मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव क्रीडा व सांस्कृतिक समितीसमोर ठेवण्यात आला असल्याची सविस्तर माहिती क्रीडा समिती सदस्य उदय गायकवाड यांनी दिली.**

गायकवाड यांनी सांगितले की, या संग्रहालयाचे लोकार्पण १८ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अन्य मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले असून मे २०२५ पासून संग्रहालय नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. चिंचवडगावातील चापेकर बाडा येथे उभारण्यात आलेले हे संग्रहालय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास जतन करणारे आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारे महत्त्वाचे केंद्र ठरत आहे.

मा. आयुक्तांच्या आदेशानुसार संग्रहालयाचे प्रशासकीय व्यवस्थापन क्रीडा विभागाकडे सोपविण्यात आले आहे. तसेच भविष्यात संग्रहालयाचे अधिक सक्षम व व्यावसायिक पद्धतीने संचालन करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ अंतर्गत ना-नफा तत्वावर स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या संदर्भातील प्रस्ताव मंत्रालयाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून महानगरपालिका व चापेकर स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ही कंपनी स्थापन होणार आहे.



> क्रांतीवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय हे आपल्या इतिहासाचा अभिमान आणि पुढील पिढीसाठी प्रेरणास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणची स्वच्छता, देखभाल आणि व्यवस्थापन कोणत्याही परिस्थितीत खंडित होऊ देणार नाही. कंपनी स्थापन होईपर्यंत आवश्यक त्या सर्व तात्पुरत्या उपाययोजना करून संग्रहालयाची गुणवत्ता आणि सुविधा अबाधित ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील. नागरिकांना एक स्वच्छ, सुबक आणि दर्जेदार अनुभव मिळावा, यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत.
>
> – उदय गायकवाड, सदस्य, क्रीडा व सांस्कृतिक समिती.

दरम्यान, संग्रहालयाच्या दैनंदिन स्वच्छता, देखभाल व देखरेख कामासाठी मे. राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, यमुनानगर यांच्याकडे १ पर्यवेक्षक व ३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. या कामासाठीचा करार ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी संपुष्टात आला आहे. मात्र संग्रहालय नियमित सुरु असल्याने स्वच्छता व देखभाल सेवा अखंडित ठेवणे अत्यावश्यक आहे.

पद्मश्री गिरिश प्रभुणे यांच्या पत्रानुसार, कंपनी स्थापन होईपर्यंत किंवा किमान पुढील सहा महिन्यांसाठी या कर्मचाऱ्यांच्या सेवेला मुदतवाढ देणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. कंपनी स्थापन प्रक्रियेस अद्याप कालावधी लागणार असल्याने (१ नोव्हेंबर २०२५ ते ३० एप्रिल २०२६) या कालावधीसाठी अंतरिम स्वरूपात सेवा सुरू ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

### स्थायी व मुख्य सभेच्या मान्यतेची प्रतीक्षा..

नगरसेवक उदय गायकवाड यांनी पुढे सांगितले की, या कालावधीसाठी सुमारे ६ लाख ५६ हजार १९६ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हा खर्च क्रीडा विभागाच्या विद्यमान अंदाजपत्रकातील "स्टेडियम, हॉल, नाट्यगृह परिसर स्वच्छता" या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणार असून यासाठी स्वतंत्र अतिरिक्त आर्थिक तरतूद करावी लागणार नाही. संग्रहालयाची प्रतिमा, स्वच्छता व पर्यटकांचा अनुभव टिकवून ठेवण्यासाठी नियमित देखभाल अत्यंत महत्त्वाची असून सेवा खंडित झाल्यास नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे सदर प्रस्ताव दि. २७ रोजी होणाऱ्या क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला असून, त्यानंतर स्थायी समितीच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार असल्याची माहितीही उदय गायकवाड यांनी दिली.

# मर्जीतील ठेकेदारावरून नगरसेविका सुलभा उबाळे यांची हमरीतुमरी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका सभागृहात भाजपा आणि प्रशासकीय सत्ताकाळात ठेकेदारांनी महापालिकेला लुटले? प्रचंड भ्रष्टाचार झाला आणि महापालिका कर्जबाजारी झाली किंबहुना मर्जीतील ठेकेदारांना काम देण्यासाठी रिंग होते आणि सेटिंग होते, असा वारंवार दावा जाहीरपणे करणाऱ्या शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे स्वत: च मर्जीतील ठेकेदाराला काम देण्यासाठी स्थायी समिती सभापतींच्या दालनामध्ये हमरीतुमरीवर आलेल्या पहायला मिळाल्या.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्थायी समितीच्या बैठकीपूर्वी सभापतींच्या दालनामध्ये चर्चा सुरू होती. बैठकीआधी स्विमिंग टँक टेंडरच्या मुद्द्यावरून प्रभाग १३ मधील नगरसेविका सुलभा उबाळे आणि भाजपाच्या नगरसेविका अर्चना कारंडे यांचे पती दोघांमध्ये खडाजंगी झाली.

विशेष म्हणजे, अर्थसंकल्पीय सर्वसाधरण सभेत महापालिकेतील पारदर्शी कारभारावर भाषणबाजी करणाऱ्या सुलभा उबाळे यांनी दुसऱ्याच दिवशी मर्जीतील ठेकेदारला काम मिळवून देण्यासाठी स्थायी समितीमध्ये राडा केला, यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून यमुनानगर येथील कै. मिनाताई ठाकरे तलावाच्या कामावरुन अनेकदा प्रसारमाध्यमांमधून चर्चा झाली



आहे. या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. महापालिका निवडणुकीपूर्वीच या ठेकेदाराला निविदा मंजुरीच्या प्रतीक्षेत होती. त्यामुळे हा विषय स्थायी समितीसमोर मान्यतेकामी आला होता.

दरम्यान, भाजपा नगरसेविका अर्चना कारंडे यांचे पति अक्षय कारंडे यांनी संबंधित ठेकेदाराबाबत आक्षेप घेतला. सोलापूर येथे याच ठेकेदाराने केलेल्या चुकीच्या आणि सदोष कामामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे सदरची निविदा रद्द करावी, अशी मागणी त्यांनी स्थायी समिती सभापतींच्या दालनात केली. वास्तविक, त्यांची सौभाग्यवती नगरसेविका अर्चना कारंडे या स्थायी समितीच्या सदस्या आहेत.

यावर, शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका तथा महापालिका स्थायी समितीच्या सदस्या सुलभा उबाळे यांनी अक्षय कारंडे यांनी बैठकीत उपस्थित राहण्याचे कारण काय? त्यांना अधिकार आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. हा विषय मंजूर करण्याचा त्यांनी आग्रह धरला. यावरून वादाची ठिणगी पडली आणि पाहता पाहता त्यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक सुरू झाली. "तुम्ही या बैठकीत कसे?" असा सवाल उपस्थित करत वाद अधिकच चिघळला. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत संताप व्यक्त केला. वाद इतका वाढला की एकमेकांवर वैयक्तिक टीकाही करण्यात आली. अखेर संबंधित व्यक्ती संतापाच्या भरात बैठक सोडून बाहेर निघून गेल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

यानंतर प्रभाग क्रमांक १३ मधील नगरसेवक बापू घोलप, उत्तम केंदळे यांना सुलभा उबाळे यांनी संपर्क केला. तसेच, भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनाही संपर्क करुन आपली बाजू मांडली. त्यानंतर अक्षय कारंडे यांनी स्वत:च्या मित्राला सदरचे काम द्यायचे आहे. त्यासाठी त्यांनी या विषयाला विरोध केला, असा दावाही त्यांनी केला.

### वादग्रस्त विषय तहकूब...

पिंपरी महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीपूर्वी पूर्व बैठकीत हा वाद झाला आहे. शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे आणि भाजपच्या नगरसेविका अर्चना कारंडे यांचे पती अक्षय कारंडे यांच्यात बाचाबाची झाली. उबाळे यांनी उन्हाळ्यामुळे तलाव तातडीने सुरू करण्यासाठी निविदा मंजूर करण्याची मागणी केली. अक्षय कारंडे यांनी संबंधित ठेकेदाराविरोधात आक्षेप घेत निविदा मंजूर करू नये असे सांगितले. पूर्व बैठकीत गैरसदस्य (अक्षय कारंडे) उपस्थित राहिल्याने वाद वाढला. उबाळे यांनी फक्त सदस्यांनाच बैठकीत परवानगी असल्याचे सांगितले. अखेर सभापती व सदस्यांनी अक्षय कारंडे यांना बाहेर जाण्यास सांगितले. स्थायी समितीच्या मुख्य बैठकीत हा विषय तहकूब करण्यात आला. या घटनेमुळे लोकप्रतिनिधींच्या ऐवजी त्यांच्या कुटुंबियांचा हस्तक्षेप वाढत असल्याची टीका झाली. अधिकृत पद नसलेल्या व्यक्तींनी निविदा प्रक्रियेत भूमिका घेतल्याने निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. शेवटी सभापती अभिषेक बारणे यांनी सांगितले की, आता हा विषय तहकूब ठेवला आहे. या विषयावर पुढील बैठकीत निर्णय घेतला जाईल.